विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे. यांचे कार्यालय

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ, पुणे — ०१

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ — फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com — वेब साईट- www.dydepune.com


जा.क्र.शिउसं/उमाशि—३/११वी/पुवि/२०१६/

दिनांक: २६ मे, २०१६

6 JUN 2016

# इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश सन २०१६—२०१७

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रांतील शैक्षणिक वर्ष २०१६—२०१७ मधील इयत्ता ११ वी प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत, हे आपणांस ज्ञात आहेच. सदर प्रवेश ऑनलाईन पध्दतीने (MKCL) महाराष्ट्र ज्ञान मंडळ यांचे कडून होणार आहेत.

## मुख्याध्यापकांसाठी सूचना पत्र

- प्रवेश अर्जाचा भाग १ पूर्ण झालेला आहे. त्यापैकी काही विद्यार्थ्यांनी पार्ट १ चा भाग मुख्याध्यापकांनी (सामाजिक व विशेष आरक्षणाच्या बाबतीत) अप्रुव्हल करण्याची प्रक्रीया त्वरीत करावी.
- इयत्ता १० वी चा निकाल ऑनलाईन मिळाल्यानंतर पार्ट २ तथा (Option Form) पसंतीक्रम भरण्यासाठी विद्यार्थ्यांना एकत्रित बोलावून मार्गदर्शन करावे.
- पसंतीक्रम भरतांना निवडलेली शाखा, माध्यम, अनुदान प्रकार यांचे कॉलेज कोड विद्यार्थ्यांनी व्यवस्थित तपासून भरावेत. त्याबाबत त्यांना सांगण्यात यावे. पूर्वतयारी म्हणून माहिती पुस्तकातील नमुना अर्जातील भाग २ ची झेरॉक्स करुन त्यामध्ये कॉलेज कोड नंबर प्रथम भरुन घ्यावेत व त्यानंतर मूळ फॉर्म भरावा म्हणजे मूळ फॉर्ममध्ये चूका किंवा खाडाखोड होणार नाही.
- कार्यालयास आलेल्या अनुभवानुसार काही विद्यार्थी घराजवळचे कॉलेज सोडून मित्र—मैत्रिणी गटानुसार प्रतिथयश कॉलेजमध्ये प्रवेशासाठी पसंतीक्रम देतात. तथापि हे विद्यार्थी इयत्ता १२ वी ला सदरचे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय बदलून मागण्यासाठी कार्यालयाकडे मोठया प्रमाणात मागणी करतात. हा मुद्दा विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावा.
- व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्यांक कोटा, इनहाऊस कोटा हे प्रवेश कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. त्या साठीचा अर्ज www.pune.fyjc.org.in या वेबसाईटच्या होमपेजवर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी सदर अर्ज डाऊनलोड करुन, प्रिंट काढून संपूर्ण भरलेला अर्ज संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात भरुन द्यावयाचा आहे.
- उर्दु, तेलगू, गुजराथी, हिंदी इत्यादी माध्यम तसेच किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम (M.C.V.C), होमसायन्स, तांत्रिक कनिष्ठ महाविद्यालय, रात्र कनिष्ठ महाविद्यालय) इत्यादींचे प्रवेश ऑफलाईन (Off-Line) पध्दतीने प्रवेश होणार आहेत याची माहिती विद्यार्थी व पालकांना देण्यात यावी.

- पसंतीक्रम देण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुस्तकातील माहितीचा पूर्ण अभ्यास करावा. त्यातील कॉलेजनिहाय, शाखनिहाय, माध्यमनिहाय कनिष्ठ महाविद्यालये यांचे कट्ऑफ मार्कस् या बाबींचा पसंतीक्रम देताना विचार करावा.
- विद्यार्थ्यांना किमान एक शाखा व कमाल दोन शाखंची निवड करता येईल त्याचे पसंतीक्रम विद्यार्थ्यांनी/पालकांशी चर्चा करुन भरावेत अशा सूचना द्याव्यात.
- पसंतीक्रम देतांना पहिल्या गटामध्ये संपूर्णपणे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील आपल्या गुणवत्तेनुसार पसंतीक्रमानुसार कमाल ३० पर्यंत पसंतीक्रम देता येतील. (यामध्ये घरापासूनचे अंतर, मिळालेले गुण याचा विचार करावा).
- दुसऱ्या गटामध्ये पसंतीक्रम देतांना पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील आपल्या निवास स्थानानजिकचा पसंतीचा कोणताही एक झोन निवडून त्यामधील गट एक मध्ये दिलेले पसंतीक्रम वगळून त्या झोन मधील उर्वरीत सर्व किंवा कमाल २० पसंतीक्रम देण्याबाबत विद्यार्थ्यांस अवगत करावे.
- पसंतीक्रम भरतांना विद्यार्थ्यांच्या चूका होतात त्या होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
- मुख्याध्यापक, वर्गशिक्षक अथवा शाळा कॉलेजातील कर्मचारी यांनी कोणत्याही परिस्थितीत नेमक्या कनिष्ठ महाविद्यालयाचा पसंतीक्रम भरण्याबाबत विद्यार्थ्यांस/पालकांस आग्रह धरु नये.
- एस.एस.सी बोर्डाव्यतिरिक्त इतर बोर्डांचे रिझल्ट लागलेले असल्याने अशा विद्यार्थ्यांच्या संदर्भात (सामाजिक आरक्षण व विशेष आरक्षण) तपासणी करुन अप्रुव्हल करण्यासाठी झोन प्रमुखांशी/मार्गदर्शन केंद्रांशी संपर्क करण्यास सांगावे.
- सदर परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

mRaut 6.6.16

(मिनाक्षी राऊत)
सचिव,
इ.११वी केंद्रिय प्रवेश नियंत्रण समिती, पुणे.
तथा
सहा. शिक्षण संचालक,
पुणे विभाग, पुणे.